# ...आणि जगानं अनुभवलं वाजपेयींचं कणखर नेतृत्व

नवी दिल्ली:राजकीय वर्तुळात अटलबिहारी वाजपेयी हे एक मवाळ व सौम्य स्वभावाचे नेते म्हणून ओळखले जात होते. मात्र, देशहिताचे किंवा व्यापक जनहिताचे निर्णय घेताना त्यांनी कधी तडजोड केली नाही. कारगील युद्ध आणि पोखरण अणुचाचणीसारख्या कठीण प्रसंगांमध्ये वाजपेयींमधील कणखर नेतृत्वाचं दर्शन सर्वांना झालं. प्रसंगी अमेरिकेलाही न जुमानण्याची हिंमत वाजपेयी यांनी दाखवली होती.

वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारनं मे १९९८ मध्ये पाच अणुचाचण्या घेतल्या. सत्तेत आल्यानंतर केवळ एका महिन्यात घेण्यात आलेल्या या चाचण्या जगाला, विशेषत: अमेरिकेला हादरवणार्या ठरल्या. भारतानं अमेरिकेच्या हेरगिरी उपग्रहाला चुकवून या चाचण्या पार पाडल्या होत्या. रशिया आणि फ्रान्सनं भारताच्या या चाचण्यांचं समर्थन केलं तर, अमेरिका, कॅनडा, जपान, ब्रिटन, युरोपीय महासंघाने भारतावर अनेक प्रकारचे निर्बंध लादले. मात्र, वाजपेयी डगमगले नाहीत. त्यांनी देशांतर्गत आर्थिक सुधारणांना गती देऊन हे निर्बंध निष्प्रभ ठरवून टाकले. या निर्बंधांची विशेष झळ भारताला बसली नाही. भाजप आणि वाजपेयींच्या प्रतिमेच्या दृष्टीने या अणुचाचण्या लाभदायीच ठरल्या होत्या.

कारगील युद्धादरम्यानची मुत्सद्देगिरी वाजपेयींच्या कणखरतेची साक्ष देणारी आहे. लाहोर भेटीत दोन देशांदरम्यानचे संबंध सुधारण्यासाठी वाजपेयी प्रयत्न करत असताना पाकिस्तान काश्मीरमध्ये घुसखोरी करत होता. हिवाळ्यात काश्मीरच्या नियंत्रण रेषेवरील अतिउंचावर असलेल्या चौक्यांवर उणे ५० पर्यंत तापमान घसरत असल्याने दोन्ही देशांकडून या चौक्या रिकाम्या केल्या जात. उन्हाळा सुरू होताच दोन्ही देशाचे सैनिक परत चौकीवर रुजू होत. पण १९९९च्या सुरुवातीला पाकिस्ताननं आपले सैनिक आणि अधिकारी दहशतवाद्यांच्या वेशात भारतीय रिकाम्या चौक्यांवर घुसवले. सोबतीला काही दहशतवादीही होते. उन्हाळा सुरू होताच भारतीय सैन्याच्या ध्यानात ही बाब आली आणि जून १९९९मध्ये ऑपरेशन विजय ही कारवाई सुरू करण्यात आली. भारतीय सैन्याला अतिदुर्गम प्रदेश, अतिउंच शिखरे, बोचरी थंडी यांचा सामना करावा लागला. तरी हवाई दल आणि भूदलाच्या एकत्रित कारवाईने पाकिस्तानच्या सैन्याल्या आसमान दाखवले.

नवाझ शरीफ यांनी याही परिस्थितीचं भांडवल करून त्याला आंतरराष्ट्रीय स्वरूप द्यायचा प्रयत्न केला. चीनला भेट देऊन त्यांनी मदतीची याचना केली. पण भारतानं मोठ्या चातुर्यानं 'ऑपरेशन विजय'ची कारवाई नियंत्रण रेषेपर्यंतच मर्यादित ठेवली होती. भारताच्या या पवित्र्यामुळं चीननंही हस्तक्षेप नाकारला. नवाझ शरीफ यांनी मग अमेरिकेकडं मदतीची याचना केली. तत्कालीन अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी मध्यस्थीची तयारी दाखवत वाजपेयींना चर्चेसाठी वॉशिंग्टनला बोलावले पण वाजपेयींनी बाणेदारपणे हे निमंत्रण धुडकावून लावलं. यामुळं अमेरिकेला सणसणीत उत्तर मिळालंच पण काश्मीर प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचा आणि तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप करवून शिमला करार मोडण्याचा पाकिस्तानचा डावही उधळला गेला.



## अटलजी

अटलजी त–हा
तुमची निराळी
तुमची पातळी
अलाहिदा
अटलजी बाज
तुमचा खरा
नव्हता थारा
हलकेपणास
अटलजी तुम्हा
चिंता देशाची
बाकी कशाची
तमा नव्हती
अटलजी कहर
असा वक्तृत्वाचा
रोमांच देशभक्तिचा
अंगी उठतसे
अटलजी तुम्ही
मुत्सद्दी खरे
युनोत वारे
आपलेसे केले
अटलजी चतुर
तुमची निती
शत्रुची फजिती
पार केली
अटलजी मैत्री
तुमची चौफेर
विरोधक फितुर
तुमच्यापुढे
अटलजी कौतुक
तुम्हा नेहरूंचे
किटाळ पूर्वग्रहांचे
तुम्ही घालविले
अटलजी दुर्गा
इंदिरेस म्हटले
राष्ट्र पहिले
तुमच्यासाठी
अटलजी तुम्ही
सरकार पडू दिले
पण वाचविले
संविधानास
अटलजी प्रेम
तुम्हा सर्वांचे
नसे धर्माचे
सोयरसुतक
अटलजी पोरका
हिंदूस्थान झाला
टिपूस डोळा
एकेकाच्या
अटलजी जाताना
केली करामात
गुंफला भारत
एका दु:खात
अटलजी आम्ही
देतो वचन
सोडू मी पण
तिरंग्यासाठी

**... जी.बी.देशमुख**
**अमरावती**
**मो. ९४२३१२४८३८**

# भारतीय राजकारणातील एक तत्ववादी पर्व संपले!: विखे पाटील

मुंबई, दि. १६: माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या निधनामुळे भारतीय राजकारणातील एक तत्ववादी पर्व संपले असून, त्यांच्या रूपात एक समर्पित, संवेदनशील आणि खंबीर नेतृत्व हरपल्याचे विधानसभेतील विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले आहे.



वाजपेयी यांच्या निधनावर दु:ख व्यक्त करताना ते म्हणाले की, कवि मनाचे वाजपेयी संवेदनशील तर होतेच. पण ते तेवढेच कणखरही होते. देशहित हेच त्यांचे पहिले प्राधान्य होते. पंतप्रधान म्हणून त्यांनी देशासाठी भरीव योगदान दिलं. १९९१ मध्ये भारताने उदारीकरणाचे धोरण स्वीकारले आणि वाजपेयींच्या काळात त्याला गती देण्यात आली. पंतप्रधान म्हणून त्यांनी अनेक चांगले निर्णय घेतले. त्या काळात आमचे वडील बाळासाहेब विखे पाटील यांनी संत तुकाराम महाराजांची प्रतीमा असलेले नाणे काढण्याची मागणी केली होती आणि त्या मागणीला अटलबिहारी वाजपेयी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. तसा निर्णय घेऊन त्यावर तातडीने अंमलबजावणी करण्यात आली व नवी दिल्लीतील एका सोहळ्यात थाटामाटात संत तुकाराम महाराजांची प्रतीमा असलेल्या नाण्याचे अनावरण झाले, अशी आठवणही विखे पाटील यांनी विषद केली. एक उत्तम वक्ते म्हणून देखील अटलबिहारी वाजपेयींचे नेहमीच स्मरण केले जाईल. त्यांचे अनेक भाषण, कविता आपण ऐकल्या आहेत. अतिशय परखड आणि नेमक्या शब्दांत व्यक्त होण्याची विलक्षण शैली त्यांच्याकडे होती. त्यांच्या देहबोलीतून आणि शब्दांतून त्यांचा बाणेदारपणा प्रकट होत असे. त्यांच्या निधनामुळे भारताची मोठी हानी झाली असून, भारताच्या संसदीय लोकशाहीच्या इतिहासात त्यांचे नाव अजरामर राहिल, या शब्दांत राधाकृष्ण विखे पाटील यांनी वाजपेयी यांना श्रद्धांजली अर्पण केली.

# मै मरने से नही डरता: वाजपेयी

### साहित्याच्या सेवेत रमणारा राजकारणी

अटलबिहारी वाजपेयी यांच्या राजकीय कर्तृत्वानं त्यांची साहित्यिक कामगिरी काहीशी झाकोळून गेली होती. असं असलं तरी अखेरपर्यंत त्यांनी साहित्यसेवेचा वसा सोडला नव्हता. त्यांच्यावर सरस्वतीचा वरदहस्त होता. राजकारणाच्या धबडग्यातून, ताणतणावातून वेळ काढून ते आपल्या मनातील विचारांना शब्दरूप देत राहिले. त्यामुळंच त्यांची डझनाहून अधिक पुस्तकं प्रकाशित झाली. त्यात सर्वाधिक कवितासंग्रहांचा समावेश आहे. तर, काही संसदेतील भाषणांचे खंड आहेत. हिंदीतील जाणकार समीक्षकांनी त्यांच्या कवितांचं कौतुक केलं होतं. राजकीय व साहित्यिक कारकिर्दीची दखल घेऊन वाजपेयी यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आलं होतं.



अजातशत्रू, कर्मयोगी लोकनेता आणि संवेदनशील कवी ही अटल बिहारी वाजपेयी यांची विविध रुपे. आपल्या वाणीनं करोडो लोकांना मंत्रमुग्ध करणारा अमोघ वक्ता म्हणूनही त्यांनी भारतीय जनमानसावर ठसा उमटवलेला आहे. त्यांची भाषण आजही भारतीय जनतेसाठी प्रेरणादायी असून राज्यकर्त्यांसाठी दीपस्तंभ आहेत. आज त्यांच्या निधनानंतर 'मै मरने से नही डरता, डरता हूँ तो सिर्फ बदनामी से डरता हूँ' हे भाषण सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यांचं हे ऐतिहासिक भाषण आजही कालातीत आणि तितकंच प्रेरणादायी आहे.

अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना त्यांच्या विरोधात २८ मे १९९६ रोजी विरोधकांनी संसदेत अविश्वास ठराव आणला होता. त्यावेळी वाजपेयी सत्तेचे लोभी असल्याचा त्यांच्यावर विरोधकांनी आरोप केला होता. त्यामुळे ते व्यथित झाले होते. या आरोपांना उत्तर देताना त्यांनी संसदेत हे तडाखेबंद भाषण करत विरोधकांची बोलती बंद केली होती. यावेळी त्यांनी प्रभू रामचंद्राचा श्लोकही वाचून दाखवला होता. ते म्हणाले होते, 'मै मरने से नही डरता, डरता हूँ तो सिर्फ बदनामी से डरता हूँ'. वाजपेयींनी त्यांच्या खास शैलीत हे भाषण केलं होतं. त्यामुळे संसदेत प्रचंड सन्नाटा पसरला होता. या प्रसंगानंतर वाजपेयींवर पुन्हा असे आरोप करण्याची विरोधकांची कधीच हिंमत झाली नाही.

१९७७ मध्येही संयुक्त राष्ट्र संघातील त्यांचं भाषण प्रचंड गाजलं होतं. त्यावेळी ते तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात परराष्ट्र मंत्री होते. या सरकारचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी संयुक्त राष्ट्र संघात पहिल्यांदाच भाषण केलं होतं. हे भाषण त्या काळात प्रचंड गाजलं होतं. या भाषणात 'वसुधैव कुटुम्बकम'चा नारा देतानाच मानवाधिकाराबरोबरच वर्णभेदावरही त्यांनी भाष्य केलं होतं. 'मैं भारत की ओर से इस महासभा को आश्वासन देना चाहता हूं कि हम एक विश्व के आदर्शों की प्राप्ति और मानव कल्याण तथा उसके गौरव के लिए त्याग और बलिदान की बेला में कभी पीछे नहीं रहेंगे.' असं त्यांनी संयुक्त राष्ट्र संघाच्या मंचावरून ठणकावून सांगितलं होतं. त्यांच्या या भाषणानंतर संयुक्त राष्ट्र संघाच्या चर्चेचा नूरच पालटला होता.

### समर्पीत करणारे व्यक्तीमत्व हरपले

माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या निधनामुळे भारतीय जनता पक्षाचा परीवार आज पोरका झाला आहे. राजकारणापलिकडे सबंध जोपासून त्यांनी नितीमूल्यांची जपवणुक केली. तसेच उच्च कोटीचा आदर्श प्रस्थापित केला. त्यांनी राष्ट्रासाठी आपली जीवन समर्पित केले. अशी व्यक्ती आज आपल्यातून निघून गेल्याने शहर जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या वतीने या महामानवाला विनम्र श्रध्दांजली.

**-जयंत डेहनकर,**
**शहराध्यक्ष भारतीय जनता पक्ष, अमरावती**

### राजकारणातील महापुरुष हरवला - ना. मदन येरावार

प्रकांड पंडीत, उच्च नितीमत्तेचे महान विद्यालय व राजकारणातील महान ऋषी, महापुरुष अटलबिहारी वाजपेयी आज आपल्यात नाहीत या गोष्टीवर विश्वास बसत नाही. त्यांच्या निधनाने शब्दही निशब्द झाले आहेत.

भारतीय जनता पक्षाचे जे वटवृक्ष आज भारतीय राजकारणामध्ये उभे आहे , जी ताकद सामान्य कार्यकर्त्यांना आज मिळालेली आहे , त्याची बांधणी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करून अटल बिहारी वाजपेयीजी यांनी केली आहे . त्यांचे जीवन भावी पिढ्यांसाठी दिपस्तंभासारखे प्रेरणादायी ठरेल. भारतमातेचे महान सुपूत्र आदरणीय अटल बिहारी वाजपेयी याना भावपूर्ण श्रद्धांजली.

### महान राष्ट्रभक्त योद्धयास देश मुकला -ना.अहीर

महान दार्शनिक तथा अष्टपैलू व अजातशत्रू व्यक्तीत्व पूर्व प्रधानमंत्राी भारतरत्न श्रध्देय अटलबिहारी वाजपेयी यांच्या दु:खद निधनामुळे देशाने कुशल राजनितीज्ञ, तत्वचिंतक व समरसतेचा अविरत मुलमंत्रा जपणारा मातृहृदयी नेता गमावला असून अटलजींच्या निधनाने देशाची फार मोठी हानी झाली असल्याची शोक संवेदना केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांनी व्यक्त केली.

लोकसभेत प्रतिनिधीत्व करतांना अटलजींचा नेहमीच सहवास लाभला. ओजस्वी वाणी व संसदेतील त्यांची महत्वपुर्ण भाषणे, राष्ट्रहिताची धोरणे, अफाट निर्णयक्षमता व राष्ट्रसुरक्षेसाठी त्यांनी केलेले भक्कम कार्य देशवासीयांच्या नेहमीच स्मरणात राहील. त्यांच्या निस्पृह, निव्याज व राष्ट्रसमर्पित कार्याची महती अभिमानास्पद होती. त्यांच्या राष्ट्रभक्तीला सर्व समावेशक वृत्तीला जवळून बघण्याचे सौभाग्य लाभले. हे जिवन सार्थकी झाल्याचा माझ्यासाठी अमुल्य क्षण होता, अशा शब्दात त्यांनी आपली भावना व्यक्त करून या महान राजकीय योध्दाच्या आत्म्यास ईश्वर शांती प्रदान करो अशी शोकात्म प्रतिक्रीया वाजपेयींच्या निधनाबद्दल ना.अहिर यांनी व्यक्त केली.

### अटलजी सर्वधर्म समभाव मानणारे नेते- आ.हरिभाऊ राठोड

अटलबिहारी वाजपेयी हे सर्वधर्म समभाव मानणारे नेते होते, ते सॉफ्ट लाईन हिदुत्व मानणारे होते. माझी खासदारकीची उमेदवारी देतांना, सर्वप्रथम त्यांनी मला फोन केला होता, आणि जेव्हा जेव्हा ते मुंबईत यायचे तेव्हा गोपीनाथ मुंडे याच्या बंगल्यावर थांबायचे, त्यामुळे त्यांची जवळून सेवा करण्याची संधी मला मिळाली. त्यांच्या जाण्याने देशाची फार मोठी हानी झाली आहे.

२२ जानेवारी २००४ रोजी पंढरपूर येथे धनगर, भटके विमुक्त समाजाचा महामेळावा, प्रकाश शेंडगे यांनी आयोजित केला होता, त्या मेळाव्याला १० लाख लोक हजर होते, या मेळाव्याचा मी सहआयोजक होतो, ते पंतप्रधान होते, त्यांचे भाषण लिहण्याचे सौभाग्य मला मिळाले. त्यांनी या मेळाव्यात बंजारा नायक अशी पदवी मला दिली होती.

ह्या मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक गोपीनाथजी मुंडे आणि प्रमोदजी महाजन होते. भारतीय जनता पार्टीचे हे त्रिमूर्ती कर्णधार आज आपल्या मधून, निघून गेले आहे, फक्त त्यांच्या आता आठवणी उरल्या आहे. संपूर्ण भटके विमुक्त, ओबीसी समाजातर्फे मी त्यांना हृदययापासून श्रद्धांजली देत आहे .











## हिंदुत्वाच्या वटवृक्षा...

काळाच्या कपाळावर
गीत कोरणारा तु एक झंझावात, एक महामानव
शब्दांच्याही पलिकडे गेलेला
गीतेचा नवा अध्याय तू
साऱ्या अंधार प्रदेशांना, आशावादाच्या नव्या
पहाट किरणांनी तेजोमय करणारा दीप तू
तुच झालास आता एक कविता या भारत वर्षाची
दु:खाला कुर्वाळता कुर्वाळताच
आयुष्य जगणारा, व अनेकांना आयुष्य देणारा
महापुरूष तु!
देवघराच्या मंद तेवणाऱ्या समईसारखा, शांत,
सोज्वळ, हिंदुत्वाच्या वटवृक्ष तू
वंदे मातरम् रक्त रक्तात फुलवणारा गंधीतसा
कमळ तू
जगा अन् जगू द्या या वचनाचा आचरण कर्ता
तर शांती साठीच अणूउर्जा देणारा योध्दा तू
कारगिल असो की, काश्मिर
जय जवान- जय किसान- जय विज्ञान म्हणून
वर्तमानात, भविष्याची नोंद घेणारा भाष्यकार तू!
सुख शांतीचा पहाटपक्षी होवून आलास
अन् झालास तू एक कविता, एक गीत,
भारताच्या सुख वैभवशाली इतिहासाची
इतिहासाच्या पानावर तुझे पाऊल
कोरून जाईन हिंदुस्थानची एक नवकविता
त्या पावलांना माझा प्रणाम

**विष्णू सोळंके**
**अमरावती, मो. ९४२०७१९७७२**

## वाजपेयींची संपत्ती किती?

गेली पाच दशकं देशाच्या राजकारणावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी आपल्यामागे केवळ ५८ लाख रुपये एवढी संपत्ती सोडून गेले आहेत. त्यातही त्यांच्या नावावर ३० लाख रुपये एवढी रोख रक्कम आहे.

अटल बिहारी वाजपेयी यांनी २००४ मध्ये निवडणूक आयोगाला प्रतिज्ञापत्र सादर केलं होतं. त्यात त्यांच्या संपत्तीचा उल्लेख करण्यात आला आहे. या प्रतिज्ञापत्रानुसार वाजपेयींच्या नावावर ५८ लाख ९९ हजार २३२ रुपये चल-अचल संपत्ती आहे. त्यात चल संपत्ती ३० लाख ९९ हजार २३२ एवढी असून अचल संपत्ती २८ लाख एवढी आहे. माजी पंतप्रधान असल्याने त्यांना दर महिन्याला २० हजाराची पेन्शन मिळत होती. तसेच त्यांच्या दिमतीला एक सचिवही होता. शिवाय कार्यालयीन खर्च म्हणून त्यांना ६ हजार रुपये अतिरिक्त भत्ताही दिला जात होता. वाजपेयी आयुष्यभर अविवाहित होते. १९९८ मध्ये ते ७ रेसकोर्स रोडवर राह्यला आले होते. त्यावेळी त्यांच्यासोबत त्यांची मैत्रीण राजकुमारी कौल या त्यांची दत्तक मुलगी नमिता आणि जावई रंजन भट्टाचार्य यांच्यासोबत राह्यला आले. वाजपेयींचं मृत्यूपत्र अद्याप समोर आलेलं नाही. मात्र २००५ च्या हिंदू वारसा हक्क कायद्यानुसार त्यांची दत्तक कन्या नमिता आणि जावई रंजन भट्टाचार्य यांनाच वाजपेयींचे उत्तराधिकारी मानलं जाणार असून त्यांच्याकडे त्यांची संपत्ती सोपवली जाण्याची शक्यता आहे, असं सूत्रांचं म्हणणं आहे.

# नैतिक मुल्यांवर अढळ श्रध्दा असणारा, अजातशत्रू लोकनेता गमावला!

## माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी यांच्या निधनावर कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष खा. अशोक चव्हाण यांची प्रतिक्रिया

मुंबई, दि. १६: देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या निधनाने नैतिक मुल्यांवर अढळ श्रध्दा असणारा, अजातशत्रू लोकनेता गमावला, अशा शब्दात महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष खा. अशोक चव्हाण यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

अटलबिहारी वाजपेयी यांच्या निधनावर दु:ख व्यक्त करताना ते म्हणाले की, सुमारे पाच दशकाच्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत अटल बिहारी वाजपेयी यांनी तीन वेळा देशाचे पंतप्रधानपद भूषवले. खासदार, केंद्रीय मंत्री लोकसभेतील विरोधी पक्षनेते अशा विविध पदांवर कार्यरत असताना त्यांनी देशाच्या विकासात मोलाचे योगदान दिले. आपल्या अमोघ वक्तृत्वाने वाजपेयी यांनी दीर्घकाळ संसद गाजवली. अटलबिहारी वाजपेयी संवेदनशील कवी व विशालहृदयी व्यक्तीमत्व होते.

मनमिळावू स्वभावामुळे स्वपक्षासोबतच इतर पक्षातही वाजपेयींचे अनेक मित्र होते. देशाचे माजी गृहमंत्री व आमचे वडील स्व. डॉ. शंकरराव चव्हाण साहेबांशी अटलबिहारी वाजपेयी यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. डॉ. शंकरराव चव्हाण साहेबांच्या अमृतमहोत्सवी सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाला ते आवर्जून उपस्थित होते. पक्षाच्या पलीकडे जाऊन त्यांनी डॉ. शंकरराव चव्हाण यांनी केलेल्या कामाची प्रशंसा केल्याचे आजही आपल्या स्मरणात आहे. त्यांच्या निधनामुळे देशाच्या राजकारणात कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. अटलबिहारी वाजपेयी यांना भावपूर्ण